# जाहिर नोटीस क्र. 1
## कृषि विभाग जि.प.नंदुरबार
## दिनांक 13 / 2 /2023

या जाहिर नोटीसीव्दारे सुचित करणेत येते की, कृषि विभाग जि.प.नंदुरबार अंतर्गत मा.कृषि विकास अधिकारी जि.प.नंदुरबार यांचे कार्यालयीन कामकाज व दौरे या कारणासाठी शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,क्रमांक भांखस-2014/प्रक्र82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01 डिसेंबर 2016 व भांखस 2021/प्रक्र 8/उद्योग-4 दि.07 मे 2021 मधील तरतूदीनुसार जीप (स्कॉर्पिओ/बोलेरो) या प्रकारातील वाहन,भाडे करारतत्वानुसार लावणे योजिले आहे. त्यानुसार इच्छुक वाहन पुरवठाधारक / मुळ वाहन मालक यांनी त्यांचे वाहनासंबंधीचे दरपत्रके खालील अटी व शर्तीना अधिन राहून दिनांक 20/ 2 /2023 दु. 3.00 वा. पर्यंत बंद लिफाफ्यात कृषि विभाग जि.प.नंदुरबार येथे मागविणेत येत आहेत. सदरची प्राप्त दरपत्रके दिनांक 21/ 2/2023 रोजी मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नंदुरबार यांचे उपस्थितीत उघडणेत येतील.

**अटी व शर्ती:-**

1) सदरचे वाहन कृषि विभाग जि.प.नंदुरबार अंतर्गत कार्यारंभ आदेशापासुन पुढील 11 महिन्याच्या कालावधीकरिता भाडे करार तत्वानुसार लावण्यात येणार आहे.
2) दरपत्रके स्विकारण्याचा /नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा तसेच भाडे तत्वावर लावण्यात आलेल्या वाहनांचा वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्णय/ परिपत्रकानुसार वाहन वापर कालावधी वाढविणे/कमी करणे अथवा करार रद्द करणे बाबतचा अधिकार मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना राखून ठेवला आहे.
3) दरपत्रक सादर केल्यानंतर ज्या वाहन मालकाचे अथवा वाहन पुरवठाधारकाचे दर सर्वात कमीत कमी असतील अशा वाहन मालकास अथवा वाहन पुरवठाधारकास वाहन पुरविणे बाबत कार्यारंभ आदेश पारित करण्यात येईल. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कार्यालयास वाहन पुरविणेची जबाबदारी वाहन मालक अथवा वाहन पुरवठाधारक यांची राहील.निविदा मंजूर होवून कार्यारंभ आदेश पारित झाल्यानंतर वाहन पुरविण्यास नकार देणा-या अथवा वाहन पुरविण्यास असमर्थता दर्शविणाऱ्या वाहन मालकाचे/ वाहन पुरवठाधारकाचे नाव जि.प.च्या काळ्या यादीत टाकण्यात येईल. किंवा कमीत कमी मंजूर दरात वाहन पुरविण्यास तयार असलेल्या मुळ वाहन धारकाचे वाहन मंजूर अटी व शर्तीनुसार भाडेकरार तत्वानुसार लावण्यात येईल.
4) दरपत्रक सादर करणाऱ्या निविदा धारकाचे स्वत:चे वाहन असावे.
5) दरपत्रकातील दरात वाहनावरील सर्व कर (पथकर, टोलकर, पार्कींग चार्जेस इ.) वाहनाचा इंधनाचा खर्च (डिझेल, ऑईल) चालकाचा भत्ता, मानधन, वाहन दुरूस्ती, हॉल्टींग चार्जेससह इ. चा खर्च वाहन मालकानेच / वाहन पुरविणाऱ्या पुरवठाधारकानेच करावयाचा आहे.
6) वाहनाचे सर्व कागदपत्रे (आर.सी.टी.सी.बुक, विम्याची कागदपत्रे, वाहनाचा परवाना,वाहन चालकाचा परवाना इ.) अद्यावत असणे आवश्यक आहे. व ती वेळोवेळी अद्यावत ठेवण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील. यासाठी जि.प.कडुन कोणतेही शुल्क दिले जाणार नाही. संपुर्ण कामासाठी कोणतेही अग्रीम वाहन मालकास /वाहन पुरवठाधारकास मिळणार नाही.
7) दरपत्रकानुसार नमुद केलेले वाहन पुरविणे संबंधित पुरवठादार यांना बंधनकारक राहील. अपरिहार्य कारणास्तव करारातील वाहन ना दुरूस्त झाल्यास त्याऐवजी दुसरे वाहन सर्व कागदपत्रे व विमा अद्यावत असलेले वाहन पुरविणे बंधनकारक राहील व मुळ वाहन दुरूस्तीनंतर तात्काळ संबंधित कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावे.
8) वाहन मालकास संबंधित कार्यालयास 24 तास वाहन सोपविलेल्या कार्यालयास पुरविणे बंधनकारक राहील. तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी वाहनांची गरज भासल्यास वाहन कार्यालयास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. सांगितलेल्या वेळेपेक्षा उशिरा येणाऱ्या वाहनाचा प्रत्येक तासासाठीचा दर रू. 100/- मात्र प्रमाणे तसेच कार्यालयास वाहन न पुरविल्यास प्रति दिवस रू. 500/- इतका दंड वाहनाच्या देयकातून कपात करण्यात येईल.
9) वाहनावर नियुक्त केलेल्या वाहन चालकाची संपुर्ण माहिती वाहन चालकाने स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. वाहन चालकाविषयी कोणतीही तक्रार कार्यालयाकडुन प्राप्त झाल्यानंतर तसेच संबंधित वाहन चालक मोठ्या रजेवर जाणार असल्यास तात्काळ दुसरा वाहन चालक पुरविणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
10) वाहनाचा करारनामा रद्द करावयाचा असल्यास दोन महिने अगोदर मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नंदुरबार यांना लेखी स्वरूपात कळवावे.
11) वाहन जि.प.मध्ये वापराच्या काळात वाहनास अथवा वाहन चालकास कोणत्याही स्वरूपाचा अपघात अथवा नुकसान झाल्यास त्यात जि.प. प्रशासनाकडुन कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.
12) वाहनाचा विमा वाहन मालकास स्वत: काढावा लागेल.
13) दरपत्रके बिनशर्त असावी. अतिरिक्त अटी व शर्ती असलेले दर विचारात घेतले जाणार नाहीत.
14) पुरवठाधारकास निवडीचा आदेश निर्गमित झाल्यानंतर उपरोक्त नमुद अटी व शर्ती रू. 100/- चे स्टॅम्प पेपरवर स्व खर्चाने करारानामा करून देणे आवश्यक आहे.
15) जाहीर नोटीसीत दर्शविलेल्या रक्कमेत निधीच्या उपलब्धतेनुसार वाढ किंवा घट होवू शकते त्याबाबतचे सर्वस्वी अधिकार मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नंदुरबार यांचे वतीने मा.कृषि विकास अधिकारी जि.प.नंदुरबार यांना राहतील. त्यानुसार विभागाकडुन देण्यात येणाऱ्या सर्व सुचनांचे पालन करणे दरपत्रकधारकास/पुरवठादारास बंधनकारक राहील.
16) करारनाम्यातील नमुद वाहन पुरविणे शक्य नसल्यास निविदाधारकाने जीप प्रकारातील इतर वाहन निविदेतील अटी व शर्तीनुसार तात्काळ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
17) इंधनदर बदलाबाबतची जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही. तसेच वाहन दुरूस्ती व मेटनन्स कामे करणे वाहनधारकाची जबाबदारी राहील.सदरचे वाहनांचे यांत्रिकी, उप विभागामार्फत तांत्रिक तपासणी करून वाहनांची आवश्यक ती दुरूस्ती करणे बंधनकारक राहील.
18) पुरवठाधारकास देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून पुढील 11 महिन्याच्या कालावधीपावेतो अथवा शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशाच्या अधिन राहून या कार्यालयाचे आदेशापावेतो लागू राहतील.
19) वाहनाची (AC) मासिक धावसंख्या 2500 कि.मी. राहील त्यापुढील जादा प्रति कि.मी. साठी 11/- वेगळा दर राहील.
20) वाहनावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, कार्यालयीन प्रकरणे नसावीत.
21) वाहनाचा वापर ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, अति दुर्गम भागात करण्यात येईल तसेच आवश्यक असल्यास जिल्हा बाहेरही करण्यात येईल.
22) वाहन 24 तास संबंधित अधिकारी यांचे कडेस उपलब्ध असावे तसेच वाहन भाड्याने लावण्याचा करार असेपर्यंत पुरवठादाराला कोणत्याही परिस्थितीत वाहनाचा खाजगी कामासाठी वापर करता येणार नाही असे आढळून आल्यास पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल व उर्वरित देयक अदा केले जाणार नाही.
23) **लिफाफ्यावर वाहनाचे दरपत्रके असे नमुद करण्यात यावे. त्यात खालील प्रमाणे कागदपत्रांचा समावेश असावा.**

1) निविदा फी व बयाणा रक्कम भरलेची स्लीप
2) वाहनाची आर.सी.टी.सी. बुक व विम्याची अद्यावत पावत्या वाहनाचे परमीट कागदपत्रांच्या छायांकीत प्रती
3) वाहनांचे रोड टॅक्स व वाहतूक परवाना अद्यावत प्रत वाहनाचे फोटो
4) वाहनांची अद्यावत योग्यता (फिटनेस ) आर.टी.ओ.चे प्रमाणपत्र
5) वाहनांचे संपुर्ण विमा व प्रवासी विमा काढलेले अद्यावत प्रत

Scanned with CamScanner

6) वाहन चालकांच्या परवान्याची व आधारकार्डाची सत्यप्रत
7) जाहीर नोटीसी मधी अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रू. 100/- मात्र चे स्टॅम्प पेपरवर नोटरी रजिस्ट्रेशन
8) मोटार वाहन कार्यालयातील नोंदणीकृत मोटार व्यावसायिक मक्तेदार जर इतर व्यक्तीचे वाहन भाडे तत्वावर घेत असेल तर त्या व्यक्तीचे वाहन भाडे तत्वावर लावणे बाबतचे वाहन मालकांचे ना हरकत करारनामा रू. 100/- मात्र चे स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.
9) प्रवासी वाहतूकीसाठी आर.टी.ओ.यांनी दिलेल्या परवान्यांची प्रत किंवा प्रवासी वाहतूक करतांना होणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या नुकसानीस वाहन मालक जबाबदार राहतील.
10) पुरवठाधारकांनी सादर केलेल्या दरपत्रकांची पडताळणी मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नंदुरबार यांचेमार्फत करणेत येईल.
11) पुरवठाधारकांना शासनामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(पी.आर.खरमाळे)
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद नंदुरबार

(प्रमोदकुमार पवार)
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नंदुरबार

Scanned with CamScanner